# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

संदर्भ :- विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि.२८/१२/२०१५ चे पत्र.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत सर्व विद्यापीठांना दि.२८/१२/२०१५ च्या पत्रान्वये सूचना दिल्याचे आपणास विदित आहेच. त्यास अनुसरून मा.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही ऑन लाईन प्रवेश प्रक्रीयेबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविले होते. सदरबाबत विद्यापीठ पातळीवर कार्यवाही सुरू आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सर्व पारंपारिक महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑन लाईन पध्दतीने करावयाचे आहेत. यासाठी सर्व महाविद्यालयांनी आपली संकेतस्थळे अनुदानित व विनाअनुदनित अभ्यासक्रम, प्रवेश क्षमता, विषय, शिक्षक, पायाभूत सुविधा, वसतीगृह इ. माहितीसह अद्ययावत करणे आवश्यक आहे. सबब, सर्व महाविद्यालयांनी आपली संकेतस्थळे अद्ययावत करून त्याबाबतची माहिती विद्यापीठ कार्यालयास कळवावी.

तसेच इ.१२ वीच्या परीक्षेपूर्वी विद्यापीठ परिक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालये तसेच उच्च माध्यमिक शाळांना नजिकच्या संलग्न महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पध्दतीबाबत लेखी स्वरूपात कळवावे.

कळावे,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/ 212
दि. 22 FEB 2017

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न पारंपारिक महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.